६

खरा वैज्ञानिक कोण ?

विज्ञान संस्थेचे अध्यक्ष बोलत होते. "...म्हणून, लोकहो, आपल्या संस्थेला आदित्यरावांसारखा जागतिक कीर्तीचा शास्त्रज्ञ लाभला हे मी संस्थेचे भाग्य समजतो. नवीन पिढीतून असेच शास्त्रज्ञ तयार होतील अशी आशा व्यक्त करून मी माझे भाषण आवरते घेतो."

टाळ्यांच्या कडकडाटात अध्यक्ष खाली बसले. आपल्या सत्काराला उत्तर द्यायला आदित्यराव पोतदार उठून उभे राहिले तेव्हा सर्वांच्या नजरा त्यांच्या चेहऱ्यावर खिळून राहिल्या. "बंधुभगिनींनो ! मला भाषणे करता येत नाहीत. तेव्हा दोन-चार मोडक्यातोडक्या वाक्यांत मी आपले आभार मानायचा प्रयत्न करतो. तोच गोड मानून घ्या... मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला हा वास्तविक माझा गौरव नसून माझ्या संस्थेचा, माझ्या सहकाऱ्यांचा गौरव आहे असे मी समजतो. वास्तविक, शास्त्रज्ञाला कृतकृत्य वाटते जेव्हा त्याच्या संशोधनाला इतर शास्त्रज्ञ मान्यता देतात... ते भाग्य मला लाभले. परंतु माझे समाधान तेवढ्यावर नाही. माझे संशोधन– मी शोधून काढलेली संकरित आवृत्ती– जेव्हा प्रत्यक्ष वापरात येईल तेव्हाच मला कृतकृत्य वाटेल. तेव्हा माझ्या शेतकरी बंधूंनी त्या बाबतीत पुढाकार घ्यावा असे मी त्यांना आवाहन करून, आणि

आपण सर्वांनी केलेल्या कौतुकाबद्दल आपले आभार मानून मी आपली रजा घेतो."

आदित्यराव खाली बसले तेव्हा श्रोते उभे राहिले आणि सर्वांनी टाळ्यांचा गजर केला. त्या गजरात आयोजकांचे समारोपांचे व ऋणनिर्देशाचे रटाळ भाषण कुठच्या कुठे वाहून गेले.

निमंत्रितांनी संस्थेच्या आवारात उभारलेल्या शामियान्याकडे धाव घेतली—कारण : त्यांच्या कार्डामागे छापलेली ओळ " समारंभानंतर शामियान्यात चहा-पानाचा कार्यक्रम होईल, त्यात आपण सहभागी व्हावे. " केवळ दोन व्यक्ती सभागृहात उरल्या. त्यांपैकी एक पत्रकारांसाठी राखून ठेवलेल्या रांगेत बसून काही टिपणे लिहीत होती. दुसरी व्यक्ती सभागृहाच्या मागच्या भागात उभी होती. ती हळूहळू चालत पुढे आली.

" आपण दिल्लीतल्या पत्राच्या पत्रकार आहात ? " पत्रकारबाईंनी आपले टिपण गुंडाळून ठेवल्यावर ती मागची व्यक्ती म्हणाली.

" होय. " संध्या पत्कीने आपले कार्ड दाखवले. " पण मी महाराष्ट्रातील काही वृत्तपत्रांना आणि मासिकांना देखील राजधानीतला मीठमसाला पुरवीत असते. "

" मग आदित्यरावांची मुलाखत वगैरे घेणार असाल ? " त्या व्यक्तीने मराठीत विचारले.

" सध्या तर तुम्हीच माझी मुलाखत घेत आहात." संध्याने हसून मराठीत उत्तर दिले.

" माफ करा ! तुम्हा पत्रकारांना प्रश्न विचारायची सवय. तुम्हाला प्रश्न विचारावयाचे नसतात हे मी विसरलो. माझी ओळख करून देतो. मी पाटील. कुशाबा पाटील. कराडकडे माझी शेती आहे. मी व आदित्य बरोबर शाळेत होतो. पुढे आदित्यचा आदित्यराव झाला—किंवा झाले. मी मात्र कुशाबाचा कुशाबाच राहिलो."

" असं का ? मग मला आदित्यरावांच्या लहानपणाची माहिती द्याल का ? " संध्याने आपली शॉर्टहॅण्डची पुस्तिका बाहेर काढली.

" त्यांच्या बुद्धीची चमक तुम्हाला लहानपणी दिसून आली का ? "

" आमच्या शाळेत ते स्कॉलर म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे पाठांतर शाळा-

भरच नव्हे तर शाळेबाहेरही विख्यात होते. एखाद्या ऐतिहासिक तहाची कलमे, अमुक तमुक देशातून काय गोष्टी निर्यात होतात, हायड्रोजन गॅसचे पाठ्य-पुस्तकातले सर्व गुणधर्म... सर्व काही तोंडपाठ. खरं सांगू ? छापू नका बरं का ?... आम्ही त्यांना पुस्तकी किडा म्हणत असू. लहानपणापासून आईबापांनीच ठरवलेले की मुलगा ' स्कॉलर ' होणार. त्याला स्कॉलरशिप परीक्षेत वरचा नंबर मिळाला पाहिजे. ही वरून ऑर्डर आल्यावर बिचारा करणार काय ? शाळा, नंतर क्लासेस, नंतर रात्री घरचा अभ्यास... अर्थात आदित्यचा पहिला नंबर ठरलेला. अभ्यासाची प्राइझेस ठरल्याप्रमाणे त्यालाच मिळणार. ठरल्याप्रमाणेच स्कॉलरशिप. सर्व काही ठरल्याप्रमाणे. आखून दिलेल्या सरळ रेषेवर पावले टाकीत जाणे हे आम्हा कोणाला जमले नसते. '' कुशाबाच्या गाडीला वेगळी दिशा दाखवण्यासाठी संध्याने विचारले.

" आणि त्यांची शाळेतली वागणूक– शाळेबाहेरची वागणूक ? ''

" अतिशय सोज्वळ, पापभीरू. कसलाही दंगा नाही, उनाडकी राहिली बाजूला. नियमाने संध्या करायचा. मंगळवारी मारुतीला जायचा. आणि इतरांनी केलेला व्रूडपणा मुळीच खपायचा नाही. थोडक्यात म्हणजे मुलांनी कसं वागावं म्हणून मोठी माणसे जे काही सांगत असतात तसा तो वागायचा.''

" पाटीलसाहेब धन्यवाद ! चला आपण चहा घेऊ उरला असला तर.'' संध्याने आपली वही बंद करून जवळच्या पिशवीत टाकली.

" तुम्ही त्यांची मुलाखत घेणार असालच. पण तुम्हा पत्रकारांना हवी असते तशी सनसनाटी बातमी मात्र मी पुरवू शकलो नाही... एखाद्याबद्दल सर्व काही गोडगोड, छान छान असले तर त्यात तुमच्या मते छापण्याजोगे काही नसते... पण मी काहीही बिंग न झाकता तुम्हाला खरे खरे सांगितले. '' संध्याने कुशाबाच्या हातात चहाचा कप दिल्यावरच त्याचे बोलणे थांबले.

संध्या मात्र विचारमग्न होती. कुशाबाच्या माहितीत खरोखरच सर्व काही गोड गोड छान छान होते का ?

" या बसा मिस अ अ... पत्की '' सोफ्याकडे निर्देश करीत आदित्यराव म्हणाले. त्यांच्या खोलीकडे सरावलेल्या दृष्टीने पाहात संध्या त्या मऊ सोफ्यावर

टेकली. आदित्यराव समोरच्या फिरणाऱ्या खुर्चीवर बसले.

संध्या काही क्षण गप्प होती.

एका शास्त्रज्ञाची खोली कशी असेल याबद्दल तिने केलेला कयास सर्वस्वी चुकला होता. खोलीत कपाटे होती पण त्यात पुस्तके नसून रिपोर्ट आणि फाइलीचे डबे होते. फळा नव्हता, खडू नव्हते, संशोधनाची नियतकालिके नव्हती. मोठाले डेस्क होते पण त्यावर फाईलींचा डोंगर. दोन टेलिफोन, एक काळा, एक लाल.

" आपल्याला प्रशासनाकरता बराच वेळ खर्च करावा लागतो का?" फायलींकडे पाहात संध्याने विचारले.

" होय, पण नाइलाज आहे माझा. केवळ इथलेच माझ्या विभागाचे प्रशासन सोडा. पण मला दिल्लीबाहेर मुंबई, कलकत्ता, बंगलोर, हैदराबाद...अनेक गावी समित्यांवर काम करावे लागते. महिन्यातून वीस दिवस मी फिरतीवरच असतो."

" मग मला तुमची भेट त्या मानाने लवकर मिळाली हे माझे भाग्य असे मी समजते. पण एक प्रश्न विचारू? तुम्हाला तुमचे महत्त्वाचे संशोधन करायला वेळ तरी कसा मिळतो?"

" माझे सहकारी आहेत की!" असे म्हणून आदित्यरावांनी जीभ चावली, आणि संभाव्य गैरसमज दूर करण्यासाठी म्हणाले, " म्हणजे त्यांना मी मूळ कल्पना सुचवल्या आणि मधून मधून त्यांचे काम तपासले की माझी जबाबदारी संपली असे मी समजतो. कनिष्ठांच्या कामात फार ढवळाढवळ करू नये असेही मी समजतो."

त्यांना कल्पना नव्हती की आपल्याकडे येण्यापूर्वी संध्या त्या 'कनिष्ठां'ना भेटून आली आहे. श्रीवास्तव, दशपुत्रे आणि चतर्जी असे ते त्रिकूट होते. संध्याला चतर्जींचे बोलणे जसेच्या तसे आठवत होते. " काम करायचे आम्ही आणि संशोधन-प्रबंधावर पहिले नाव यांचे. शोध लावायचा आम्ही पण तो आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर करायला जाणार आमचे बॉस. प्रयोगांची आखणी करताना, ते चालू असताना किंवा ते संपण्याच्या स्थितीत असताना त्यांच्याशी चर्चा करायला आम्ही जावे तर हे दिल्लीबाहेर तरी नाही तर फाइलीत गुंतलेले..."

" अरे जरा दमाने घे... संध्याताई, तुम्ही हे काही छापू नका बरं का! नाही तर आमच्या प्रमोशनवर गदा यायची." दशपुत्रे काळजीच्या स्वरात

म्हणाला होता.

" पण या कामाकरता आदित्यरावांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला त्याचे श्रेय तरी त्यांना द्यायला नको का ? " संध्याने विचारले होते; तेव्हा श्रीवास्तव मिश्किलपणे हसून म्हणाला होता, " मिस पत्की, हे राष्ट्रीय पुरस्कार कसे दिले जातात यावर तुम्हाला लेखच काय लेखमाला लिहिण्याइतका मालमसाला मिळू शकेल. पण गंमत म्हणून तुम्हाला सांगतो. जेव्हा तुम्ही आमच्या सरांना भेटायला जाल तेव्हा त्यांना त्यांच्या शोधाबद्दल विचारून पाहा. जास्त खोलात शिरलात तर ते सर्व तपशील आम्हा तिघांना विचारा म्हणून सांगतील. तसे नाही म्हणाले तर नाव बदलीन माझे. "

ते संभाषण आठवून संध्या आता आदित्यरावांना त्यांच्या शोधाबद्दल विचारणार इतक्यात त्यांचा लाल फोन वाजला. रिसीव्हर उचलून काही वेळ ऐकून आठ्या घालून ते म्हणाले, " पाटील ? कोण हा पाटील असा अचानक उगवला ? आगाऊ भेटीची वेळ न ठरवता मी भेटत नसतो... कोण कुशाबा ?... अच्छा तो कुशाबा ! बरं पाठवून दे त्याला. "

आदित्यरावांनी रिसीव्हर ठेवून चेहऱ्यावर स्मित आणले आणि म्हणाले, " आता आत येणाऱ्या व्यक्तीला मी पुष्कळ वर्षांनी पाहतोय. मुलखावेगळा माणूस आहे तो."

इतक्यात कुशाबाची स्वारी आत शिरली.

" आदित्यराव... छे छे तुला काही राव म्हणवत नाही—आदित्य ! अभिनंदन तुझं ! काल मी सत्कार समारंभात होतो. पण त्या गर्दीत तुला भेटण्यापेक्षा म्हटले आज निवांत भेटू...तुझा तो स्टेनो म्हणतोय तू फार ' बिझी ' आहेस." इतक्यात त्याचे लक्ष संध्याकडे गेले व तो म्हणाला, " अच्छा ह्या पेपरवाल्या बाईंनी तुला पकडले वाटते ? काल मला विचारत होत्या तुझ्याबद्दल. "

" बस रे लेका दोन-चार मिनिटे तरी ! " त्याला बसवत आदित्यराव म्हणाले. " तू ह्यांना माझी लहानपणची कोणती कुलंगडी सांगितलीस ? "

" त्या बाबतीत पाटीलबोवांनी माझी निराशा केली. तुमची स्तुतीच करत होते सारखी. " संध्या हसत म्हणाली.

" मग तुम्हाला छापायला गंमत हवी असली तर कुशाबाचे लहानपण पाहा. मी वर्गाचा मॉनिटर असताना किती तरी वेळा त्याला शिक्षेपासून वाचवले आहे.

तुला आठवते का कुशाबा? ती टेस्टट्यूबची घटना?"

"काय झाले त्या वेळी?" संध्याने विचारले.

"आम्ही केमिस्ट्रीचे काही प्रयोग वाचले होते. पण आम्हाला ते करून दाखवले नव्हते. तर कुशाबाने वरच्या वर्गाच्या प्रयोगशाळेत जाऊन चोरून ते प्रयोग करण्याचा प्रयत्न केला, आणि भडका उडाला. पठ्याने बरणीवर नीट न पाहता भलतेच रसायन वापरले." आदित्यराव हसत उत्तरले.

"ती माझी चूक झाली खरी पण माझा हेतू उदात्त होता. प्रयोग वाचून काय कळणार? तो स्वतः केला पाहिजे. पण त्या प्रकरणात तू माझी शिक्षा कमी करून दिलीस हे मात्र खरं." कुशाबा म्हणाला.

"पण असल्या ॲक्सिडेंटमुळे तुझी प्रयोग करायची खुमखुमी काही जिरली नाही...तसंच मिस पत्की, हा शिक्षकांना देखील भंडावून सोडे. आम्ही सगळ्या नोट्स व्यवस्थित उतरवीत असू तर हा, असे का तसे का, म्हणून प्रश्नांची सरबत्ती करी. चंद्राच्या कला समजावून देणाऱ्या मास्तरांना ह्याचा प्रश्न दर पौर्णिमेला ग्रहण का नसते चंद्राचे? क्षार आणि आम्ल लिटमस पेपरावर वेगळे प्रभाव का टाकतात? सायफन कसा काम करतो?... कुठलाही विषय त्याने सोडला नाही..."

"अरे कुतूहलातून, जिज्ञासेतून विज्ञान निर्माण होते हे तुला वैज्ञानिकाला सांगायला नको. पण मी फार वेळ तुझा घेत नाही. मला तुझ्या शोधाची माहिती पाहिजे. कराडला गेल्यावर मी त्याच्यावर प्रयोग करणार आहे. देतोस का थोडक्यात माहिती? निदान मूळ कल्पना तरी? आणि तुझी संकरित बियाणे पाहिजेत प्रयोगासाठी." कुशाबातला वैज्ञानिक डोके वर काढत होता.

आदित्यरावांनी घसा खाकरला व म्हणाले, "तुला हवी ती माहिती प्राथमिक स्वरूपात माझ्या बक्षिसाच्या भाषणात होती. त्याहून खोलवर माहिती माझ्याकडे नाही. माझ्या सहकाऱ्यांजवळ मिळेल. श्रीवास्तव, दशपुत्रे आणि चतर्जी. त्यांना तू भेट."

"पण मूळ कल्पना तरी ढोबळ मानाने सांगशील का? अन्नोत्पादन वाढवण्यासाठी पेरणी केव्हा केली पाहिजे? पाणी किती द्यायचे? खत कुठले आणि किती? जमिनीचा प्रकार कसा?"

"हे पाहा, झाली तुझी सरबत्ती सुरू! मी माझ्याजवळ तपशील नसताना ही

माहिती कशी देऊ ? तू त्या तिघांना भेट." आदित्यरावांनी मनगटी घड्याळाकडे सूचक नजरेने पाहिले.

"पण तुझ्या संशोधनाचा प्रबंध छापील किंवा तत्पूर्वीचा ?" कुशावाने जिद्द सोडली नाही.

आदित्यरावांनी घंटा वाजवली. स्टेनो आत आला. त्याला ते म्हणाले, "थॉमस, ह्या कुशावा पाटलांना श्रीवास्तवकडे घेऊन जा आणि त्यांना हवी ती माहिती द्यायला सांग... अच्छा कुशावा भेटू आपण." त्यांनी हात पुढे केला.

"बरं, माझे प्रयोग बघायला येशील ना केव्हा तरी ? तुझी बियाणे कशी काम करतायत खऱ्याखुऱ्या शेतात ते पाहायला ये." कुशावांनी निरोप घेतला.

"अवश्य" पण आदित्यरावांच्या आवाजात काही उत्सुकता नव्हती. कुशावा बाहेर पडला आणि फोन वाजला—काळा फोन.

"कोण, गीता ट्रॅव्हल्स ? अच्छा, नमस्कार खन्नाजी. आमचे बुकिंग केले का ? परवाचे ?... काय फ्लाइट शेडयूल बदलले ? काय म्हणायचे एअर इंडियाला ! मग केव्हाची फ्लाइट ?... छे छे उद्याची नको... हो चालेल. तेरवाची बुक करून टाका... मी परिसंवादाला एक दिवस उशिरा पोचेन पण इलाज नाही... उद्याचा दिवस चांगला असता तर गेलो असतो पण तो आहे अवसेचा... एअर ट्रॅव्हलबद्दल सर्व काळजी बाळगली पाहिजे अलीकडच्या दिवसांत... ठीक आहे, धन्यवाद"

रिसीव्हर खाली ठेवून आदित्यराव म्हणाले, "ह्या शुभ अणि अशुभ दिवसांतून वाट काढणे आणि एअरलाइनचे वेळापत्रक संभाळणे कठीण काम आहे. उद्या अवस, तेरवा शनीची अवकृपा म्हणून मी परवाचा दिवस ठरवला..."

"मग तुम्ही तेरवा जाण्याचे कबूल कसे केलेत ?" संध्याने कुतूहलाने विचारले.

"परवाचा दिवस शुभ आहे तेव्हा प्रस्थान ठेवणार" आपण शनीवर मात केल्याच्या आनंदात आदित्यराव उद्गारले.

"बरं ! मी आपली रजा घेते आता" संध्या आपली पुस्तिका गोळा करत म्हणाली.

"झाले तुमचे प्रश्न विचारून ?" आश्चर्याने आदित्यराव उद्गारले...

"प्रश्न फार विचारले नाहीत पण उत्तरे बरीच मिळाली" जाता जाता संध्याने

उच्चारलेल्या वाक्याचा अर्थ आदित्यरावांना उमगला नाही.

कराडपासून पंधरा मैलांवर एका खेड्यात एस. टी. च्या गाडीतून संध्या पत्की उतरली. तिने इकडे तिकडे पाहिले पण तिला अपेक्षा असलेली व्यक्ती दिसली नाही.

थोडा वेळ थांबून तिने बस स्टॉप जवळच्या पानवाल्याला काही माहिती विचारली आणि मुख्य रस्त्यापासून पुढे डावीकडे फुटलेल्या धुळीच्या मार्गाने चालू लागली. मैलभर गेल्यावर तिला पुढून धुळीचा लोट येताना दिसला. एक बैलगाडी भरधाव येत होती.

“ माफ करा संध्याताई ! कामापायी पार विसरून गेलो तुमच्या बसची वेळ ” तिला बैलगाडीत घेत आणि बैलगाडी परत उलट्या दिशेने हाकीत कुशाबा म्हणाला, “ माझ्या पोराने आठवण करून दिली तेव्हा आलो धावत.”

“ काही हरकत नाही. आम्हा शहरी लोकांना व्यायामाची संधी फार मिळत नाही... पाच मैल म्हणजे काही फार नव्हते ” बैलगाडीतले धक्केसुद्धा भरपूर व्यायाम घडवतात या जाणिवेने संध्या म्हणाली.

कुशाबाचे शेत मोठाले पण योग्य आखलेले होते. “ ही आमची पोट भरणारी शेत जमीन. येथे आम्ही ठरावीक पिके काढतो. पण इथे तुम्ही पाहण्यासारखे काही नाही. ह्या इकडे चला. ”

तिला बैलगाडीतून उतरवून पायवाटेने पाव मैलावर एका लहानग्या शेताकडे कुशाबा घेऊन गेला. त्या शेताचे बरेच लहान लहान भाग केले होते. प्रत्येक भागात धान्य वेगवेगळ्या स्थितीत दिसत होते.

“ आदित्यरावांची बियाणे ह्या इथे वापरलीत. इथे सुद्धा खताचे प्रकार वेगवेगळे पाण्याचा पुरवठा वेगवेगळा ठेवून मी पाहतोय. ती पलीकडे वेगळ्या जातीची बियाणे आहेत. ”

“ हे सगळे प्रयोगच आहेत नाही का ? काही संपूर्ण फसलेले दिसतात तर काही यशस्वी झालेत. पण अशा प्रयोगात तुमची जमीन फुकट नाही का जात ? ” संध्याने नजर फिरवत विचारले.

“ ही जमीन मी नेहमीची पिके काढण्याकरता वापरली असती तर मला

वर्षातून दहा हजार रुपये मिळाले असते... पण मुद्दा तो नाही. ह्या प्रयोगातला सर्वांत यशस्वी प्रयोग मी पुढच्या वर्षी त्या मुख्य जमिनीवर वापरला की मला जो नफा होईल, तो याच्या दसपट असेल. ''

" अन् सर्वच प्रयोग फसले तर ? '' संध्याने काही भागांकडे निर्देश करत विचारले.

" अहो एडिसनला विजेचा दिवा किंवा बेलला टेलिफोन पहिल्या झपाट्यात साध्य झाले का ? आम्ही बेल नाही की एडिसन नाही. आदित्यरावही नाही. आमचे प्रयोग जगात क्रांती घडवून आणणारे नाहीत. पण प्रयत्नानंतर यश मिळते असा माझा आजवरचा अनुभव आहे. त्याकरता मला प्रारंभी नुकसान सोसावे लागले तरी परवडले. ''

" आदित्यरावांच्या संशोधनाचा फायदा तुम्हाला होतो का ? ''

" पुष्कळ ! ती बघा भरघोस वाढलेली पिके. त्यांच्या सहकाऱ्यांच्या माहितीवरून आणि थोडे बदल माझा अनुभव वापरून केले. त्यांच्या संशोधन प्रबंधातल्या आकड्यात मी सुधारणा केली.''

" त्यांना हे कळवले का ? '' संध्याने विचारले.

कुशाबाच्या प्रसन्न चेहऱ्यावर एक दुःखाची छाया येऊन गेली. " मी त्यांना पुष्कळ वेळा बोलावले. पण त्यांच्या दौऱ्यात कराड बसत नाही. ''

" पण त्यांना आपल्या संशोधनात आणखी सुधारणा झालेली पाहावीशी वाटत नाही ? '' संध्याला आश्चर्य वाटले.

" नाही, संशोधन प्रबंध प्रसिद्ध केला की शास्त्रज्ञाचे काम संपले असे आपण मानतो. ह्या भाषेत त्यांनी मला उत्तर पाठवले. मी वैज्ञानिक नाही. पण संध्याताई हे तुम्हाला पटते का ? मुलाला जन्म देऊन आईने आपले काम संपले असे म्हणणे योग्य आहे का ? '' कुशाबाने कळकळीने विचारले.

संध्याने उत्तर दिले नाही. ती स्वतःलाच विचारत होती ' खरा वैज्ञानिक कोण ? आदित्यराव की कुशाबा ? '